# श्याम

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

**श्याम : साने गुरुजी**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

**आवृत्ती**
१५ ऑगस्ट, २०११

**किंमत**
रुपये २३०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

# श्याम

## साने गुरुजींचा त्रोटक जीवन–परिचय

कोकणातील पालगड या गावी साने गुरुजींचे वडील सदाशिवराव राहात होते. त्या ठिकाणी खोताचे काम ते करीत असत. खोताचे घराणे साधारणत: वैभवसंपन्न व श्रीमंत समजले जाते व त्यांच्या आजोबांच्या वेळची परिस्थिती तशी होतीही. पण सदाशिवरावांच्या वेळेपासून मात्र घराण्याची आर्थिक स्थिती घसरत गेली. ती इतकी की, सदाशिवरावांचे घरदारही जप्तीत नाहीसे झाले. अशा रीतीने 'बडे घर पण पोकळ वासा' झालेल्या घराण्यात २४ डिसेंबर १८९९ रोजी गुरुजींचा जन्म झाला.

गुरुजींच्या आईचे नाव 'यशोदा' होते. लहानपणापासून गुरुजींचे आपल्या आईवर अतोनात प्रेम होते. 'श्यामची आई' या पुस्तकात त्यांनी आपल्या आईच्या साऱ्या आठवणी सांगितल्या आहेत. त्यांच्या आईने त्यांच्या बालमनावर जे विविध संस्कार केले त्यातूनच गुरुजींचा जीवनविकास झाला. सर्वांभूती प्रेम करण्याचा धडा साने गुरुजींना त्यांच्या आईनेच दिला. साने गुरुजींचे मन अतिशय भावनाप्रधान व संस्कारक्षम होते. म्हणूनच आईने पेरलेल्या सद्भावनांची वाढ त्यांच्या ठिकाणी लवकर झाली.

गुरुजींचे प्राथमिक शिक्षण पालगडला झाले. प्राथमिक शिक्षण झाल्यानंतर पुढील शिक्षणाचा प्रश्न उद्भवला. पुण्यात मामांच्याकडे त्यांना ठेवण्यात आले; पण पुण्यास राहावेना. पुण्याहून पुन्हा ते आपल्या घरी पालगडला गेले आणि दापोलीच्या मिशनच्या शाळेत शिक्षणासाठी जाऊन राहिले. शाळेमध्ये 'हुशार विद्यार्थी' म्हणून ते चमकू लागले. मराठी व संस्कृत या विषयात त्यांचा हातखंडा होता. कविता करण्याचा नाद त्यांना होता. 'कवी' म्हणून शाळेत त्यांची कीर्ती पसरली. गुरुजींचे पाठांतर जबरदस्त होते. नवनीतातील वेचे त्यांना तोंडपाठ येत होते. प्राकृत पुराणादी पोथ्यांचे त्यांनी वाचन केले होते.

घरातील दारिद्र्य दिवसेंदिवस वाढतच होते. गुरुजींच्या थोरल्या भावाने नोकरी धरली होती व गुरुजींनासुद्धा आता आपण वडिलांच्यावर विसंबून राहू नये असे वाटू लागले. म्हणून त्यांनी शिकण्यासाठी कुठेतरी दूर जाण्याचा निश्चय केला. एका मित्राने त्यांना सांगितले की, ''औंध संस्थानात जा. तेथे गरीब विद्यार्थ्यांस मोफत अन्न मिळते.'' त्यानुसार गुरुजी औंध संस्थानात येऊन राहिले. शिक्षणासाठी खडतर हालअपेष्टा त्यांनी तेथे सोसल्या. माधुकरी मागितली. शिळेपाके तुकडे खाऊन त्यावर दिवस काढले. कधी काकडी खाऊन तर कधी ओळखीच्या गिरणीवाल्याकडून मिळणाऱ्या पिठावर आपली गुजराण केली; पण ज्ञानोपासना सोडली नाही. गुरुजींच्या दुर्दैवाने तेथे प्लेग सुरू झाला. औंधचे शिक्षण अर्धवट सोडून गुरुजी परत घरी पालगड येथे गेले. घरी गेल्यावर वडिलांना आपल्या पुनरागमनाचा संशय आल्याचे दिसताच गुरुजी तत्काळ पुण्यास आले व नूतन मराठी विद्यालयात दाखल झाले.

गुरुजींचा स्वभाव अतिशय भिडस्त होता. त्यामुळे त्यांचे अधिकच हाल होत. कधी डाळेचुरमुरे खाऊन दिवस काढावेत तर कधी एक वेळ जेवून राहावे. शेवटी काही ठिकाणी वार मिळाले. गुरुजींचे शिक्षण मात्र चालूच राहिले. अशा या खडतर हालअपेष्टा सोशीतच गुरुजी १९१८ साली मॅट्रिक झाले. शाळेत गुरुजी 'हुशार विद्यार्थी' म्हणून चमकले. मॅट्रिक झाल्यावर त्यांनी आपले नाव न्यू पूना कॉलेज (एस. पी. कॉलेज)मध्ये दाखल केले. एस.पी. कॉलेजमधूनच ते बी. ए. व एम. ए.च्या परीक्षा उत्तीर्ण झाले. एम. ए. झाल्यानंतर 'पुढे काय करावे' या विचारात असतानाच अंमळनेरच्या तत्त्वज्ञान मंदिरासाठी 'फेलो हवेत' अशी जाहिरात त्यांनी वाचली. गुरुजींनी अर्ज केला. त्यांना प्रवेश मिळाला; पण लवकरच त्यांनी तत्त्वज्ञानमंदिराला रामराम ठोकला व गुरुजी अमळनेर येथील शाळेतच शिक्षक झाले. थोड्याच दिवसांत ते तेथील वसतिगृहाचे मुख्य झाले. तेथील विद्यार्थ्यांच्या जीवनाशी ते समरस झाले. विद्यार्थ्यांना स्वावलंबनाने सेवावृत्ती आपल्या कृतिद्वारा त्यांनी शिकविली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी आपले सारे श्रम व सारी बुद्धी त्यांनी वेचली. 'गुरुजी' या अभिधानाला ते सार्थ ठरले. १९२८ च्या नोव्हेंबरात त्यांनी 'विद्यार्थी' या नावाचे मासिक सुरू केले. १९३० साली हिंदुस्थानात राजकीय आंदोलन सुरू झाले. गुरुजी शालेय जीवनातून मुक्त झाले. भारताच्या राजकीय जीवनात समरस होण्यासाठी त्यांनी सत्याग्रहात भाग घेतला. गुरुजींच्या जीवनातील प्रथमार्ध येथे संपून उत्तरार्थ सुरू झाला.

महात्माजींच्या राजकीय आंदोलनाचा परिणाम गुरुजींवर १९२१ पासून होत होता. १९२१ साली त्यांनी खादी वापरण्यास सुरुवात केली. १९३० साली सत्याग्रह सुरू होताच त्यांनी शाळा सोडली व खानदेशात प्रचारास सुरुवात केली. त्यांना अटक झाली. तुरुंगात विनोबा भावे त्यांना भेटले. तेथे चक्की पिसण्याचे काम त्यांनी आनंदाने घेतले. तुरुंगात विनोबाजींची गीतेवर प्रवचने होत असत. गुरुजी ती प्रवचने लक्षपूर्वक ऐकत असत. विनोबाजींवर गुरुजींची अतिशय श्रद्धा बसली. २३ मार्चला (१९३१) ते पुन्हा तुरुंगात जाण्यासाठी सुटले. १९३२ पासून १९३४ पर्यंत ते तुरुंगात होते. १९३४ ते १९३६ सालापर्यंत दोन वर्षे ते पुण्यास होते. १९३६ साली कॉंग्रेसने खेड्यात अधिवेशन भरविण्याचे ठरविले. फैजपूरची निवड केली. गुरुजींनी हे अधिवेशन यशस्वी व्हावे म्हणून जिवापाड मेहनत घेतली. त्यांच्या हस्ते स्वातंत्र्यज्योत तेथे आणण्यात आली. याच अधिवेशनात कॉंग्रेसने असेंब्लीच्या निवडणुका लढविण्याचे ठरविले. सारा देश कॉंग्रेसच्या पाठीमागे आहे, हे सिद्ध करण्यासाठी कॉंग्रेस-कार्यकर्ते झटू लागले. खानदेशाच्या खेड्यापाड्यांतून कॉंग्रेसचा संदेश पोचविण्याचे काम गुरुजींनी केले.

१९३८ साली त्यांनी कॉंग्रेस या नावाचे साप्ताहिक सुरू केले. महायुद्ध १९३९ साली सुरू झाल्यानंतर देशातील घडामोडी प्रचंड वेगाने घडून येऊ लागल्या. कॉंग्रेस मंत्रिमंडळाने राजीनामे दिले. ब्रिटिश सरकारने ९३ कलमी कारभार सुरू केला. देशात असंतोषाचे वारे वाहू लागले. याच सुमारास गुरुजींनी कॉंग्रेसचे १ लाख सभासद महाराष्ट्रात व्हावेत म्हणून उपोषण केले. १९३८ साली पिके बुडाल्यामुळे सारामाफीसाठी शेतकऱ्यांची परिषद त्यांनी भरविली. कॉंग्रेस युवक परिषद १९४० साली चांदवड येथे भरली. गुरुजींना अटक झाली. त्यांना धुळ्यास ठेवले होते. १९४२ चा लढा सुरू होईपर्यंत ते तुरुंगातच होते. १० ऑगस्टला (१९४२) त्यांना सोडण्यात आले. चळवळ जोराने फोफावत होती. गुरुजी भूमिगत होऊन चळवळी नेटाने चालविण्याचा प्रयत्न करीत होते. १९४३ मध्ये त्यांना अटक झाली. येरवड्यास त्यांना ठेवले. इतर सर्व पुढाऱ्यांबरोबर त्यांची १९४५ साली मुक्तता झाली.

काँग्रेस, मुस्लीम लीग आदी पक्षांबरोबर ब्रिटिश सरकारने वाटाघाटी सुरू केल्या. १९४६ साली देशात सर्वत्र निवडणुका होऊन काँग्रेस व मुस्लीम लीग हे दोनच पक्ष प्रबळ ठरले. स्वातंत्र्याचे नगारे देशात सर्वत्र वाजू लागले होते. स्वातंत्र्याचा उष:काल आला तरी देशातील भेदाभेद दूर झाले नाहीत याबद्दल गुरुजींना वाईट वाटे. पंढरपूरचे देऊळ हरिजनांना अद्याप खुले नव्हते. साने गुरुजींनी सहा महिने आपल्या ओजस्वी वाणीने हे मंदिर हरिजनांसाठी उघडण्यासाठी महाराष्ट्रभर प्रचार केला. सहा महिन्यांत गुरुजींच्या प्रचारात दिसून आलेल्या जनमताची पर्वा न करता बडव्यांनी हरिजनांना मंदिर बंदच ठेवले. म्हणून गुरुजींनी आमरण उपोषण आरंभिले. पुढे दादासाहेब मावळणकरांच्या मध्यस्थीने मंदिराचे दरवाजे हरिजनांसाठी खुले झाले व पांडुरंगाचे दर्शन सर्वांना घेता येऊ लागले. भारतात अनेक वाटाघाटी होऊन अखेर फाळणी होऊन स्वातंत्र्यसूर्य उगवला. स्वातंत्र्य प्राप्त झाले; पण देशात सर्वत्र दंगे व कत्तली यांना ऊत आला. तशातच ३० जानेवारी १९४८ ला महात्माजींच्यावर सायंकाळी एका माथेफिरूने गोळ्या झाडल्या व गुरुजींचा ध्येयसूर्य महात्माजींबरोबरच अस्तंगत झाला. महात्माजींचा खून एका महाराष्ट्रीयनाने केला, या पापक्षालनार्थ गुरुजींनी २१ दिवसांचे उपोषण केले.

महात्माजींच्या निर्याणानंतर देशातील परिस्थिती फारच चमत्कारिक झाली. देशातील प्रबल पक्ष जो काँग्रेस त्यातून समाजवादी गट बाहेर पडला. गुरुजींची राजकीय मते समाजवादी असल्यामुळे या पक्षाशी त्यांचा जवळचा संबंध आला. १९४८ साली १५ ऑगस्टला त्यांनी ''साधना'' साप्ताहिक सुरु केले. त्यातून ते आपले समाजवादी विचार मांडीत असत.

### गुरुजींचे वाङ्मय

गुरुजींनी विपुल वाङ्मय लिहिलेले आहे. कादंबऱ्या, लेख, निबंध, काव्य, चरित्रे, नाट्य-संवाद इ. साहित्याच्या विविध क्षेत्रांत त्यांची लेखणी अविरत चालत होती. त्यांच्या वाङ्मयातून कळकळ, स्नेह, प्रेम इ. गोष्टींचा वर्षाव झालेला आहे. त्यांच्या भाषेला एक प्रकारची धार आहे; ओज आहे. त्यांची साधीसुधी भाषाच लोकांना आवडली.

गुरुजींनी आपले सर्व लेखन समाजोद्धारार्थ लिहिले. त्यांच्या मनात राजकीय, सामाजिक व शैक्षणिक विषयांसंबंधी जे जे विचारांचे, भावनांचे कल्लोळ उठले ते ते सर्व त्यांनी आपल्या लेखणीच्या द्वारे प्रकट केले. कलेकरिता कला वा जीवनाकरिता कला अशी ध्येये डोळ्यापुढे ठेवून त्यांनी आपले वाङ्मय नटविले नाही; तर स्वत:चे समाजाविषयीचे विचार व स्वत:ला आलेले अनुभवच त्यांनी आपल्या लेखनातून प्रकट केले. कितीतरी घरगुती साधे प्रसंग त्यांनी हृद्य रीतीने वर्णन केलेले आहेत. गुरुजींचे वाङ्मय सर्वांसाठी-आबालवृद्धांसाठी आहे. बालकांना त्यांनी गोड गोष्टी सांगितल्या, कुमारांच्यासाठी ध्येय दर्शविणारे मार्गदर्शक साहित्य, चरित्रे आदी लिहिली; प्रौढांसाठी लेख, निबंध लिहिले, माता-भगिनींना स्त्री-जीवन व पत्री अर्पण केली. या विपुल वाङ्मयातील तेजस्वी रत्ने म्हणजेच 'श्यामची आई' व 'श्याम' ही पुस्तके होत.

### आंतरभारती

गुरुजींचे आणखी एक मोठे कार्य म्हणजे आंतरभारतीची स्थापना करण्याचा प्रयत्न हे होय. प्रांताप्रांतातील हेवादावा अद्यापही नष्ट झालेला नाही. प्रांतीयता ही भारताच्या एकत्वाला बाधक ठरणार असे दिसू लागले म्हणून त्यांनी प्रांताप्रांतातील द्वेष नाहीसा होऊन सर्वत्र बंधुप्रेमाचे वारे वाहावेत, यासाठी निरनिराळ्या प्रांतातील लोकांनी परस्परांच्या भाषा शिकाव्यात, चालीरीती समजून घ्याव्यात, यासाठी आंतरभारतीचा प्रयोग करून पाहण्याचे ठरविले. यासाठी पैसा जमवून निरनिराळ्या प्रांतीय भाषा शिकू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रवींद्रनाथ टागोरांच्या शांतिनिकेतनप्रमाणे काही सोय करावी, ही मनीषा त्यांनी महाराष्ट्र साहित्य संमेलनामध्ये याच ठरावावर बोलताना व्यक्त केली होती. त्यासाठी त्यांनी काही पैसाही गोळा केला होता. पण कार्य अपुरे असतानाच दि. ११ जून १९५० ला त्यांचे देहावसान झाले.

✦✦✦

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| ❍ | आरंभ | .......... | १३ |
| १. | देवाने दिलेले डोळे | .......... | २१ |
| २. | खोटीखोटी झोप | .......... | २७ |
| ३. | माझा पहिला मुसलमान मित्र | .......... | ३३ |
| ४. | मी राम राम म्हणवून घेत होतो | .......... | ४१ |
| ५. | आमच्या गावातील नाटक कंपनी | .......... | ४५ |
| ६. | दागिन्यांची हौस | .......... | ५० |
| ७. | पुण्यास पहिले प्रयाण | .......... | ५७ |
| ८. | पक्षी उडाला ! | .......... | ६२ |
| ९. | फिरून पुणे | .......... | ७४ |
| १०. | दगडांचे म्हसोबा | .......... | ८२ |
| ११. | थोर मनाचा मजूर शिवराम | .......... | ८८ |
| १२. | दूध | .......... | ९६ |
| १३. | माझी खरूज | .......... | १०२ |
| १४. | शनिमाहात्म्य व रामाचे चित्र | .......... | १०६ |
| १५. | पुनश्च पलायन | .......... | १११ |
| १६. | उजाडल्यावर | .......... | १२१ |
| १७. | कोकणात घरी | .......... | १२५ |

| | | | |
|---|---|---|---|
| १८. | दापोलीची इंग्रजी शाळा | .......... | १३४ |
| १९. | आत्याचे घर | .......... | १३८ |
| २०. | शाळेतील वातावरण | .......... | १४८ |
| २१. | सानुला कवी | .......... | १५५ |
| २२. | प्रेमळ स्मृती | .......... | १६५ |
| २३. | वर्गातील व शाळेतील मौजा | .......... | १८७ |
| २४. | मधल्या सुट्टीतील मेवे | .......... | २०५ |
| २५. | श्याम व राम | .......... | २१२ |
| २६. | दापोलीला राम राम | .......... | २३६ |

✦✦✦

# आरंभ

श्याम अलीकडे कायमचाच आजारी होता. तो अशक्त होत चालला होता. त्याच्या स्नेह्यासोबत्यांना, त्याच्या सहकारी मित्रांना त्याच्याबद्दल भीती वाटे; परंतु श्याम त्यांच्या चिंतेला हसे व ''वेडे आहात तुम्ही सारे!'' असे म्हणे. श्याम सकाळी-सायंकाळी थोडे हिंडे, फिरे. विशेष दगदग व यातायात त्याच्याने होत नसे. आश्रमाच्या अंगणातील एका निंबाच्या झाडाखाली आरामखुर्ची टाकून तो पडून राही. तेथून गावची नदी नीट दिसत असे. नदी म्हणजे देवाची झुळझुळ वाहणारी दया. नदी म्हणजे गावची आई, असे श्याम नेहमी म्हणे.

नदी म्हणजे कर्मयोगाची जिवंत मूर्ती. तिला आळस माहीत नाही, विश्रांती ठावी नाही. सतत जीवन असेतो ध्येयाकडे दृष्टी ठेवून वाहणे, हेच तिला ठावे. आजूबाजूच्या सृष्टीला हसवीत, फुलवीत, समृद्ध करीत ती सगळीकडे धाव घेत असते.

**फेडीत जगाचे पापताप। पोषीत तीरीचे पादप।**
**जाय जैसे आप। जान्हवीचे।।**

नदी वाकडी गेली, काट्याकुट्यातून गेली, उच्छृंखलपणाने कड्यावरून उडी घेऊ लागली तरी ती ध्येयाकडे जात असते. समुद्राला भेटण्यासाठीच तिचे सारे उद्योग. नदी म्हणजे अमर आशा. नदी म्हणजे आशागीत. मनुष्य वाकड्या मार्गाने गेला, रानात शिरला तरी शेवटी एक दिवस तो मंगलाकडेच येईल, असे नदी सांगत असते. सारे प्रवाह शेवटी अनंत सागरालाच भेटणार. सारे मानवी समाज शेवटी अनंत कल्याणाकडे, अपार आनंदाकडे, निरतिशय सौंदर्याकडेच जाणार, यात शंका नाही.

आई मुलाला आंघोळ घालते, त्याचे हागमूत काढते, त्याला स्वच्छ राखते. नदी साऱ्या गावाला स्वच्छ ठेवते. गावाने केलेली घाण ही आपोमाता दूर करिते. लोक नदीचे जसे काही सत्त्व पहात असतात सर्व व्यवहार या मातेच्या अंगावर ते करितात, तरीही माता ते सारे सहन करितो. गावातील गाईगुरे, म्हशी, बैल यांनाही ती स्वच्छ राखते. तिला ना कोणी हीन, ना कोणी तुच्छ. सारी तिची लेकरे.

श्याम नदीचा भक्त होता. तो आजारी असला तरी नदीकडे पाहून तो आजारीपणा विसरे. खुर्चीत पडल्यापडल्या गाणी गुणगुणे. लहान मुले आली तर त्यांना गोष्टी सांगे, चांगली गीते शिकवी.

श्यामच्या आश्रमातील मित्र एके दिवशी आपापसांत बोलत होते. श्याम त्या वेळेस तेथे नव्हता. गोविंदा म्हणाला, ''श्यामच्या आईच्या आठवणी किती सुंदर होत्या. राहून राहून त्यांची आठवण येते.'' नामदेव म्हणाला, ''त्या छापून काढल्या तर हाहा म्हणता खपल्या.'' रघुनाथ म्हणाला, ''तीन महिन्यांत सारी आवृत्ती संपली. पुन्हा ना तिचा गाजावाजा, ना तिची प्रसिद्धीपत्रे, ना जाहिराती.'' राजा म्हणाला, ''किती तरी लोकांची श्यामला अभिनंदनपर पत्रे आली.'' एकाने लिहिले, ''श्यामच्या आईची पारायणे आमच्या घरात आम्ही करीत आहोत. पोथीचा अध्याय वाचावा त्याप्रमाणे एकेक प्रकरण रोज रात्री घरातील सर्व मंडळी जमून आम्ही वाचतो.'' दुसऱ्याने लिहिले, ''ही आमची बालबोध गोष्टीरूप गीताच आहे.'' एका मुलीने लिहिले, ''हे पुस्तक लिहून तुम्ही आम्हांवर फार उपकार केले आहेत.''

राम म्हणाला, ''तुला सातारची गम्मत आहे का माहीत? श्यामचा एक मित्र एका गृहस्थाकडे पुस्तक घेऊन गेला व म्हणाला, ''घेता का विकत?'' त्या गृहस्थांनी 'श्याम' हे नाव ऐकताच कपाळाला आठ्या घातल्या. ते म्हणाले, ''मुसलमानधार्जिण्या त्या श्यामचे पुस्तक आम्हाला नको.'' परंतु तो मित्र म्हणाला, ''वाचून तर पाहा. नको असेल तर मी परत नेईन. तुम्हांला आवडले तर पैसे द्या.'' ते गृहस्थ म्हणाले,''बरे आहे. राहू दे.'' पुढे तो मित्र परत जेव्हा विचारावयास गेला तेव्हा ते भले गृहस्थ म्हणाले, ''मी बोललो त्याची क्षमा करा. मला आणखीही एक प्रत द्या. मुलामुलींच्याच काय पण लहानथोरांच्याही सदैव हातात असावे, असे हे पुस्तक आहे.''या पुस्तकाचा हा केवढा विजय!''



सदू म्हणाला, ''परंतु पुण्याची गोष्ट तुम्हांला कोठे माहीत आहे? श्याम पुण्याला गेला होता. तेव्हा त्याच्याकडे काही लहान मुले आली. त्या मुलांत श्यामच्या ओळखीचा एक मुलगा होता. श्यामने त्याला विचारले, ''काय पाहिजे तुम्हाला? गोष्ट का सांगू?'' ती मुले म्हणाली, ''तुम्हाला पाहायला आम्ही आलो आहोत. 'श्यामची आई' म्हणजे का तुमची आई? तुमचे 'श्याम' नाव किती गोड आहे! असे म्हणून ती मुले गेली.''

गोविंदा म्हणाला, ''आपण श्यामला त्याच्या साऱ्याच आठवणी विचारू या. किती चांगले होईल! श्यामजवळ शेकडो आठवणी असतील. किती तरी लहान-लहान प्रसंग असतील की, ज्यांतून श्यामच्या जीवनाला प्रकाश मिळत असेल. या सर्व आठवणींचा ठेवा जर आपणांस मिळाला तर आपण केवढे भाग्यवान होऊ !''

राजा म्हणाला, ''श्याम ऐकेल तर ना. त्याच्या मनास त्रास होईल असे आपण काहीही करता कामा नये. त्याची प्रकृती सध्याच किती दुबळी झाली आहे, हे आपण पाहातच आहो. श्याम आपल्यामध्ये फार दिवस राहील असे मला तरी वाटत नाही. हा विचार मनात येऊ नये, परंतु येतो खरा, 'मन चिंती ते वैरी न चिंती,' मी या विचाराने फार कष्टी होतो.''

नामदेव म्हणाला, ''म्हणून तर आपण श्यामजवळचे सारे घेऊन ठेवले पाहिजे. त्याच्या स्मृतींचा सुधासंग्रह हा तरी आपणाजवळ कायमचा राहील.''

रघुनाथ म्हणाला,''आपण सारे जण श्यामजवळ जाऊन बोलू या.''

गोविंदा म्हणाला, ''चला रे सारे.''

ते सारे मित्र श्यामच्या भोवती गोळा झाले. श्यामने त्यांच्याकडे पाहिले. श्यामच्या तोंडावर प्रसन्न हास्य खेळत होते. श्याम मधुर वाणीने म्हणाला, ''काय रे पाहिजे आहे? सारे माझ्याभोवती का रे जमा झाला आहात? काही कमीजास्त का आहे?''

राम म्हणाला, ''श्याम! तुला एक प्रार्थना करावयास आम्ही आलो आहोत. आमच्या प्रार्थनेस नकार देऊ नकोस.''

श्याम म्हणाला, ''तुम्ही मला इतके प्रेम देत आहात की, माझ्याने नाही म्हणवणार नाही. हा श्याम तुमच्या प्रेमावर जगतो आहे. हे दुबळे शरीर नाही तर कसचे टिकाव धरिते? चकोर चंद्राच्या किरणावर पोसतो, असे कवी म्हणतात.

त्याचप्रमाणे माझे जीवन तुमच्या प्रेमावर चालले आहे. तुम्हाला मी काय देणार नाही? आणि द्यावयास तरी काय राहिले आहे?''

राजा म्हणाला, ''पुष्कळ आहे व तेच आम्ही मागत आहोत. श्याम! आईच्या आठवणी तू सांगितल्यास. आमच्याच हृदयांत त्या अमर झाल्या आहेत. असे नाही, तर शेकडो लोकांच्या जीवनांत त्या अमर झाल्या आहेत. तुझ्या आईच्या आठवणी सांगितल्यास, त्याप्रमाणे इतरही ज्या आठवणी असतील त्या आम्हांला सांग.''

राम म्हणाला, ''भावाबहिणींच्या, आप्तेष्टांच्या, मित्रांच्या, निरनिराळ्या शाळांतील शिक्षकांसबंधीच्या तुझ्या शेकडो आठवणी असतील. तुझ्या आठवणी लहान लहान असतील, परंतु त्या आठवणी सांगताना त्यांच्याभोवती जे वातावरण तू उत्पन्न करतोस ते किती रसमय असते म्हणून सांगू!''

नामदेव म्हणाला, ''आठवणी सांगता सांगता साऱ्या भारताचा जणू इतिहासच तू सांगू लागतोस. भारतमाता तुझ्या रोमारोमांत शिरलेली आहे. आम्हांला समाज, धर्म, इतिहास, शिक्षण, वाङ्मय, आरोग्य, आहारविहार इ. शेकडो गोष्टीसंबंधीचे ज्ञान त्यामुळे होते. ते ज्ञान गोष्टीच्या ओघात सहज येऊन जाते. मुद्दाम सांगू म्हटल्याने थोडेच सांगता येणार आहे? श्याम, तू गेलास तर आम्हाला कोण सांगेल? कोण हसवील? कोण रडवील?''

श्याम म्हणाला, ''मी येथून जाणार नाही, तुम्हाला सोडून मी कोठे जाऊ? माझे ते सारे विचार मी कधीच सोडून दिले.''

प्रल्हाद म्हणाला, ''तुमच्या रुग्ण शरीरामुळे तुम्ही दुसरीकडे कोठे आता जाणार नाही. परंतु कदाचित कायमचे देवाघरी लवकर गेलात तर?''

श्याम म्हणाला, ''त्याची भीती कशाला? मरण म्हणजे मेवा. जीवनाला मरणाचे फळ व मरणाला जीवनाचे कोंब फुटतात. मला तर मृत्यू म्हणजे देवाकडे जाण्याचे द्वार वाटते. एखाद्या मोठ्या राजवाड्याला अनेक प्रवेशद्वारे असतात. त्याप्रमाणे मृत्यूची अनंत प्रवेशद्वारे ओलांडीत ओलांडीत सिंहासनावर बसलेल्या त्या राजराजेश्वराचे दर्शन घ्यावे लागते.''

**जन्ममरणाची पाऊले टाकीत**
**येतो मी धावत भेटावया ।। जन्म।।**

श्याम तो गोड चरण म्हणत राहिला. सारे स्तब्ध राहिले.



गोविंदा म्हणाला, ''श्याम! तुझ्या प्रकृतीमुळे आम्हास असे वाटते. मरणाला आम्ही भीत नाही. परंतु तो दिवस येण्यापूर्वी तुझ्याजवळचे सारे आम्हाला दे. तुला त्रास होईल कदाचित, कदाचित बरेही वाटेल. कारण गतायुष्यातील अनेक प्रसंगांकडे पाहताना आपण अनासक्त रीतीने पाहतो व आनंद अनुभवतो. गतायुष्यातील सारे गोडच वाटू लागते. सांगशील का? प्रत्यही थोडेथोडे सांगत जा.''

शंकर म्हणाला, ''श्यामच्या आईच्या आठवणी रात्री प्रार्थनेच्या वेळी एकेक याप्रमाणे सांगण्यात आल्या. आता या आठवणीही प्रार्थनेच्या वेळेसच सांगाव्या. प्रार्थना संपली की प्रवचन सुरू.''

श्याम म्हणाला, ''तुमची सर्वांची मने दुखविणे माझ्या जिवावर येते. स्वतःचे जीवन आठवीत बसण्यापेक्षा आता देवाला आठवण्याची वेळ आली आहे. परंतु जीवनातील बऱ्यावाईट प्रसंगांतून शेवटी सत्यच प्रकट होत असते. सत्यदेवच हळूहळू प्रतीत होत असतो. ज्यात तुमचा आनंद, त्यात माझा आनंद. सांगत जाईन. सांगण्यासारख्या आठवणी सांगत जाईन.''

राम म्हणाला, ''संकोच करू नको. तुझे मन भावनामय व संस्कारक्षम असल्यामुळे शेकडो प्रसंगांचे ठसे कायमचे उठलेले असतील, आम्ही किती तरी गोष्टी विसरतो. परंतु तुझ्या सारे ध्यानात असते. एखादा शब्द, एखादी वस्तू, एखादा लहानसाच प्रसंग. तुझ्यावर त्याचा किती तरी परिणाम होत असतो. म्हणजे तू वायुभारमापक यंत्रच आहेस. सारे सारे सांग.''

श्याम : काय सांगावयाचे ते मी फारसे ठरवीत बसणार नाही. मला लहानपणापासूनचे जे जे आठवेल ते ते सांगेन. ते सारे तुम्हाला आवडेलच असे नाही. एखादे दिवशी मी सांगण्याच्या भरात आलो तर वेळेचेही भान मला राहणार नाही. माझी कादंबरी सुरूच राहील.

राम : ज्या वेळेस तू इतका रंगशील, त्या वेळेस आम्हाला तरी काळाचे स्मरण कशाला राहील? आमचीही झोपबीप उडून जाईल. आम्ही भावनांच्या खळखळाटाबरोबर वाहात जाऊ.'

श्याम : नेहमीच असे होईल, अशातला प्रकार नाही. एखाद्या दिवशीचे बोलणे नीरस वाटेल, तर एखाद्या दिवशी सागर उचंबळेल.

गोविंदा : आम्ही सर्व गोष्टीस तयार आहोत. जे येईल ते नीरस असो वा रसमय असो. आम्हांला तुझ्या तोंडातून जे येईल ते रसाळच वाटेल.

नामदेव : तुझ्या शाळेतील गमती सांग. मास्तरांजवळ तुम्ही सारे कसे वागत असा, मधल्या सुट्टीत काय करीत असा, ते सारे सांग. ते ऐकण्यात मजा असते.

राम : श्यामने शाळेत मास्तरांना मुळीच त्रास दिला नसेल.

श्याम : मी शाळेत गरीब गाय नव्हतो. खूप खोड्या केल्या आहेत. सांगेन, त्याही गमती तुम्हाला सांगेन. सायंकाळची प्रार्थना होताच मी एकदम सांगत जाईन. प्रस्तावना नको. काही नको. परंतु एक गोष्ट तुम्ही विसरू नका. माझ्या आईच्या आठवणी तुम्हाला जितक्या आवडल्या तितक्या ह्या आवडणार नाहीत. कारण आईच्या जीवनात मी आकंठ डुंबत असे. आईच्या स्मृतिसागरात श्यामला जितका आनंद होत असे तितका स्वत:च्या स्मृतीत त्याला होत नाही. आई जितकी मला माझी वाटत असे तितका मी माझा स्वत:चा नाही. माझ्या जीवनात मी फार खोल बुड्या मारणार नाही. कारण फार खोल बुड्या मारीन तर गाळच भरपूर असावयाचा. मला ते धैर्य होणार नाही. आईच्या स्मृती म्हणजे पावित्र्याची खाण होती. तशी आता असेलच असे नाही. माझ्या आठवणीत माझ्या चोऱ्यामोऱ्या येतील, माझी पलायने येतील. हिंदू-मुसलमानांचे प्रश्न येतील. सारे येईल. ती ती आठवण सांगताना मी माझ्या मनातील शेकडो विचार नकळत बोलून जाईन. हे विचार कित्येकांना सहन होतील, कित्येकांना मानवतील ते देव जाणे.

राम : जे विचार स्वतःला हितकर वाटले ते दुसऱ्याला सांगणे, हे कर्तव्य आहे. मग तसे करण्यामुळे कुचेष्टा होवो व दगड डोक्यात मारले जावोत.'

श्याम : होय, आपले विचार सांगत असताना असा एखादा दगड डोक्यात बसून मरण यावे, असे कितीदा मला वाटत असे. आपले विचार ओठांवर खेळत असता आलेले मरण, हे परमथोर मरण होय. परंतु माझे भाग्य तेवढे नाही. असे मरण म्हणजे देवाच्या लाडक्या लेकराची ती मिळकत असते. हौतात्म्य म्हणजे ईश्वराची परमकृपा.

नामदेव : परंतु प्रत्येक व्यक्ती थोडीफार तर हुतात्म्याच असते. प्रत्येकाला या संसारात कष्ट आहेतच.

राम : ते कष्ट निराळे. गाढवाला गोणी वाहण्याचे कष्ट का नाहीत? ध्येयासाठी कष्ट आनंदाने भोगणे यात हौतात्म्यच असते.



शंकर : परंतु हे वादविवाद कशाला? आपण साधी माणसे आहोत.'

श्याम : अरे, चित्कळा तुमच्यातही आहे. ईश्वराचे तेज तुमच्यांतूनही प्रकट होईल. 'आपण साधी माणसे, आपण साधी माणसे' असा हा बावळट नम्रपणा काय कामाचा?

नामदेव : फुगा असतो किती लहान, सुरकतलेला, बोटभर। परंतु त्यात फुंक मारा. कसा तेजस्वी दिसतो, सुंदर दिसतो, मोठा होतो.

गोविंदा : ध्येयाचा वारा आपल्या जीवनात भरपूर शिरू दे. आपली जीवनेही मग सतेज दिसतील.

शंकर : परंतु फार वारा घातला तर फुगे फुटतात.

राम : फुटू दे. तसेच पडून राहण्यापेक्षा ध्येयाला जीवनात ओतप्रोत भरताना हे जीवन फुटू दे. फुटू दे हे मडके. हे मृण्मय मडके फुटण्यासाठीच आहे.

राजा : प्रमाणात सारी मौज आहे. शक्तीप्रमाणे वागावे.

राम : शक्तीही वाढत वाढत जात असते.

शंकर : परंतु एकदम वाढत नाही.

प्रल्हाद : तुमच्या वादविवादाने श्यामला त्रास होईल. तुम्ही उठा सारे. तुमचे वादविवादच फार.

नामदेव : वादविवादाला भिऊन थोडेच चालणार आहे?

गोविंदा : काम करू लागले म्हणजे आपोआप सारे समजू लागते. चर्चा ह्या पुष्कळ वेळा निरुपयोगी असतात.

राम : मग ठरले ना श्याम? आज रात्रीपासून सुरू होऊ दे रामायण.'

श्याम : होऊ देत सुरू भाकडकथा.

नामदेव : श्याम! तू आमची अशी टिंगल रे का करतोस? आमच्या भावना का दुखावतोस? असतील तुझ्या भाकडकथा व रडकथा. आम्हाला त्या गोड आहेत, पवित्र आहेत.

श्याम : बरे, मी असे पुन्हा बोलणार नाही. परंतु कोणत्याही गोष्टीस अवास्तव महत्त्व देऊ नये. माझ्याजवळ बोलता हे ठीक परंतु बाहेर जगात असे म्हणाल तर फजीत व्हाल, समजले ना?

राम : चला रे आता जाऊ; श्यामला आता विश्रांती घेऊ दे. त्याला दिवसा